# विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मराठीतील

# नाव पडताळणीचे आवाहन

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३० व्वा दीक्षांत समारंभ दि. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेला आहे. विद्यापीठाद्वारे माहे डिसेंबर २०२३, फेब्रुवारी/मार्च २०२४ आणि मे/जून २०२४ ह्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर मराठी (देवनागरी) नाव अचूक यावे याकरीता नावाची पडताळणी व दुरुस्तीकरीता विशेष सुविधा विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विद्यार्थी प्रवेश अर्ज भरतेवेळी मराठी नावाची नोंद अचूक करीत नाहीत, याकरीता पदवी प्रमाणपत्रावर मराठीतील नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी नाव दुरुस्तीचे अभियान विद्यापीठामार्फत राबविण्यात येत आहे. उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना दीक्षांत सोहळ्यात देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रासाठी आपले मराठी नाव पडताळणी आणि दुरुस्तीची सुविधा विद्यापीठाच्या https://30convocation.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून, विद्यार्थ्यांनी मराठी नाव तपासून त्यात काही दुरुस्ती असल्यास दि. १९ जानेवारी २०२५पर्यंत करावी. विद्यार्थ्यांनी आपले मराठी नाव दुरुस्ती न केल्यास भविष्यात प्रमाणपत्रावरील मराठीतील नाव दुरुस्तीसाठी विद्यापीठामार्फत शुल्क आकारण्यात येईल. सर्व विद्यार्थांनी दिलेल्या मुदतीत संकेतस्थळास भेट देऊन पदवी प्रमाणपत्रावरील मराठी नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी आणि योग्य ती दुरुस्ती करावी,असे आवाहन विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक श्री.भटूप्रसाद पाटील ह्यांनी केले आहे.